## अर्ज निशाणी क्रमांक ४५ खालील आदेश

**(पारीत केलेला दिनांक ०४.०२.२०२३)**

**०१.** प्रस्तूत अर्ज प्रतिवादी क्रमांक ०४ ने विना कैफियत आदेश रद्द करुन कैफियत स्विकारण्यासाठी दाखल केला आहे.

**०२.** वादीने अर्जास हरकत घेतली आहे.

**०३.** दोन्ही पक्षकारांच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

**०४.** प्रतिवादीने **दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चा क्रम ०८ नियम ०१ सह वाचनीय क्रम ०५ नियम ०१** नुसार तीस अगर नव्वद दिवसांच्या मुदतीत कैफियत दाखल केली नाही.

**०५.** दावा स्थावर मिळकतीबाबत आहे. प्रतिवादीने कैफियत दाखल करण्याची संधी नाकारल्यास त्याचे नुकसान होईल. प्रतिवादीला कैफियत दाखल करुन त्यास बचाव मांडण्याची संधी दिल्यास वादाचे कायमपणे निराकरण होण्यास मदत होईल. म्हणून प्रतिवादीला विलंब माफ करुन कैफियत दाखल करण्यास परवानगी देणे उचित आहे. वादीचे त्यामुळे कोणतेही नुकसान संभवत नाही. म्हणून खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज **नि.क्र.४५** खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्रमांक ०४ विरुध्द झालेला विना कैफियत आदेश त्याने वादीला खर्च रक्कम रुपये ३००/– देण्याच्या अटीवर रद्द करुन कैफियत अभिलेखावर घेण्यात येते.

**(श्री. सुभाष ल. फुले.)**

**दिनांक :– ०४.०२.२०२३.** **दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,**

**ठिकाण :– औसा.** **औसा. जिल्हा लातूर.**